माहिती अधिकार

महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय,
कोंढवा-येवलेवाडी,पुणे महानगरपालिका.
कार्यालयाचा पत्ता :- जे.एस.पी.एम.बिल्डींग,
सावंत कॉर्नर,कात्रज, पुणे-४६.
कार्यालयाचा संपर्क क्र.:- ०२०-२५५०८८००
ईमेल :kondhwa@punecorporation.org
विस्तारित क्रमांक :- ०२०-२५५०८८०२/०३
जावक क्र. :- ३६४० दिनांक :- २६/११/१८

अपिल प्राधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त कोंढवा-येवलेवाडी
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
अपिल क्र.:अ.प्रा.तथा महा.सहा.आयुक्त कार्यालय कोंढवा-येवलेवाडी /पुणे मनपा/अपिल/दि.२६.११.१८

१. अपिलकर्ता श्री दीपक बाळकृष्ण वायंगणकर,
राहणार :- फ्लॅट नं-४,निर्मिती हाईट्स, जिजामाता चौक,
बालाजीनगर, पुणे ४३.

२. जन माहिती अधिकारी तथा,
वरिष्ठ आरोग्य निरिक्षक,कोंढवा-येवलेवाडी कार्यालय,
पुणे महानगरपालिका.

श्री दीपक बाळकृष्ण वायंगणकर
विरूध्द
जनमाहिती अधिकारी तथा वरिष्ठ आरोग्य निरिक्षक, कोंढवा-येवलेवाडी, पुणे महानगरपालिका.

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपिल**

अपिलकर्ता श्री दीपक बाळकृष्ण वायंगणकर यांनी दिनांक ११/१०/२०१८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा वरिष्ठ आरोग्य निरिक्षक,कोंढवा-येवलेवाडी,पुणे महानगरपालिका यांचेकडे निर्मिती हाईट्स बालाजीनगर येथील इमारतीच्या गळतीचे अनुसंधान करणेबाबतच्या अर्जावर केलेल्या कारवाईची माहिती मिळणकामी अर्ज केला होता.

जनमाहिती अधिकार तथा वरिष्ठ आरोग्य निरिक्षक,कोंढवा-येवलेवाडी,पुणे महानगरपालिका यांनी अपिलकर्ता यांस उपरोक्त बाबत पाहणी केली असल्याचे सांगितले.

माहिती अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकाऱ्याने उपलब्ध करून दिलेली माहिती व इतर पत्र व्यवहारासंबंधी माहिती खालीलप्रमाणे आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| माहिती अधिकारातर्गत अर्ज सादर केल्याचा दिनांक | माहिती उपलब्ध करून द्यावयाचा अंतिम दिनांक | अर्जदारास उत्तर पाठविल्याचा दिनांक | अर्जदाराने शुल्क भरल्याचा दिनांक | अर्जदारास माहिती दिल्याचा दिनांक |
| ११/१०/२०१८ | १०/११/२०१८ | निरंक | निरंक | निरंक |

प्रथम अपिल अर्ज दाखल करण्याचे कारण पुढीलप्रमाणे – अपूर्ण माहिती मिळाली असल्याचे नमूद केले आहे.

| प्रथम अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रथम अपिल अर्ज दाखल करावयाचा अंतिम दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज मुदतीत दाखल केला आहे का ? | प्रथम अपिलाच्या विलंबाबाबत निवेदन दिले आहे का ? | प्रथम अपिल सुनावणी सुचना पाठविल्याचा दिनांक |
| ०९/१२/२०१८ | १२/११/२०१८ | होय | – | १७/११/२०१८ |

प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ :- दि. २६/११/२०१८ रोजी सायंकाळी ०४.०० वाजता.
सुनावणीस अपिलकर्ता :- उपस्थित
सुनावणीस जनमाहिती अधिकारी :- उपस्थित

जनमाहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | अर्जदाराने मागितलेली माहिती | जनमाहिती अधिकाऱ्याने दिलेले उत्तर/माहिती |
|---|---|---|
| १ | निर्मिती हाईट्स बालाजीनगर येथील इमारतीच्या गळतीचे अनुसंधान करणेबाबतच्या अर्जावर केलेल्या कारवाईची माहिती मिळणकामी अर्ज केला होता. | उपरोक्त बाबत पाहणी केली असल्याचे सांगितले. |

## विवेचन

अपिलकर्ता श्री दीपक बाळकृष्ण वायंगणकर, यांचा माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत दिनांक ११/१०/२०१८ रोजी अर्ज कार्यालयाकडे दाखल झाला. तरी संबधित जनमाहिती अधिकारी यांनी सदर अर्जाची कोणतीही माहिती दिली नसल्याचे अर्जदार यांनी सांगितले.

अर्जदाराने अर्ज दाखल केलेपासून दरम्यानच्या काळात सतत आरोग्य निरीक्षकांच्या बदल्या झालेल्या असल्याचे जनमाहिती अधिकारी तथा वरिष्ठ आरोग्य निरीक्षक यांनी सांगितले. तसेच सदर ठिकाणी भेट देवून सदर सोसायटीच्या अध्यक्षांशी समक्ष चर्चा करून गळतीच्या ठिकाणाची पाहणी करून आज रोजी अहवाल तयार असलेचे जनमाहिती अधिकारी तथा वरिष्ठ आरोग्य निरीक्षक यांनी सांगितले.

## –: आदेश :–

जनमाहिती अधिकारी तथा वरिष्ठ आरोग्य निरीक्षक यांनी आज दि.२६/११/२०१८ रोजी कार्यालयास दाखल केलेल्या अहवालाची प्रत विनामुल्य देणेत यावी असे अपिल प्राधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त यांनी आदेश दिले.

प्रकरण निकाली काढण्यात येत आहे.

(रविंद्र घोरपडे)
अपिल प्राधिकारी तथा
महापालिका सहाय्यक आयुक्त,
कोंढवा-येवलेवाडी कार्यालय,
पुणे महानगरपालिका.

दिनांक आणि ठिकाणः २६/११/२०१८,पुणे.

टीप :– १. सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास माहिती अधिकार अधिनियम कलम १९(३)नुसार मा.आयुक्त,राज्य माहिती आयोग,नविन प्रशासकिय इमारत,विधानभवन समोर पुणे ४११००१ यांचेकडे अपिल करता येईल.

२. प्रथम अपील सुनावणी आदेशाची प्रत सुनावणी नंतर सात दिवसांच्या मुदतीत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रत :–१. अपिलकर्ता श्री दीपक बाळकृष्ण वायंगणकर,
राहणार :– फ्लॅट नं–४,निर्मिती हाईट्स, जिजामाता चौक,
बालाजीनगर, पुणे ४३.

२. श्री मंगलदास माने,
जन माहिती अधिकारी तथा,
वरिष्ठ आरोग्य निरीक्षक , कोंढवा-येवलेवाडी कार्यालय,
पुणे महानगरपालिका.

यांचेकडे पुढील जरूर त्या कार्यवाहीसाठी.......